18-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 17-05-2025 23:37 Page 1



# अटल आसराचे सर्व अर्ज लवकरच मंजूर होणार

## आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये | डिचोलीत प्रलंबित अर्जांसाठी विशेष शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १७ :** सरकार तुमच्या दारी अंतर्गत आमचे सरकार अनेक उपक्रम राबवत असून अटल आसरा योजनेअंतर्गत गरजूंना घरे निर्माण करून देण्यासाठी जी योजना आहे, त्या योजनेच्या प्रलंबित अर्जांची छाननी करताना एका छताखाली सर्व कागदपत्रांची छाननी होऊन अर्ज मान्य व्हावा. यासाठी समाज कल्याण खात्याने एक दिवशी शिबिराचे आयोजन करून एक स्तुत्य उपक्रम आखून सरकारचे जनतेपदी असलेली आस्था दाखवून दिल्याचे डिचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी केले.



**मुळगाव : अटल आसरा शिबिरात सहभागी लाभार्थीसोबत आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, अजित पंचवाडकर, विजयकुमार नाटेकर, प्रदीप रेवोड कर व इतर.**

मुळगाव येथे समाज कल्याण खात्यातर्फे अटल आसरा योजनेअंतर्गत गरजूंना निवारा देण्यासाठी दीड लाख व इतर मदत देण्याची योजना आहे, त्या अंतर्गत सुमारे ८८ अर्ज कागदांच्या पूर्तते अभावी प्रलंबित होते. त्याची पूर्तता करण्यासाठी खात्यातर्फे मुळगाव व डिचोलीत विशेष अटल आसरा योजना मंजुरी शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरात सर्व प्रकारचे दस्तऐवज कागदपत्रे प्रमाणपत्रे याबाबत असलेल्या शंका दूर करून मामलेदार तलाठी संबंधित अधिकारी यांच्या उपस्थितीत अर्ज मंजूर करण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी समाज कल्याण खात्याचे अजित पंचवाडकर नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर प्रदीप रेवडकर विविध पंचायतीचे सरपंच पंचायत सदस्य आधी उपस्थित होते.

अजित पंच वाडकर यांनी समाज कल्याण खात्याच्या योजनांची माहिती देताना तातडीने अर्ज निकालात काढण्यासाठी व लोकांना तातडीने ही मदत मिळावी यासाठी या शिबिराचे आयोजन राज्यभरात करण्यात येत असल्याचे सांगितले.

आमदार शेट्ये यांनी हे अर्ज मंजूर करून लवकरात लवकर लोकांना घरे उभारण्यासाठी आर्थिक मदत करण्यात येईल. मात्र त्याचा उपयोग स्कूटर घेण्यासाठी व इतर कामासाठी करू नये, असे आवाहनही आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी केले.

पान १ वरून

### राज्यातील पहिले वातानुकूलित प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित

या उद्‌घटन सोहळ्याला स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेकांनी ही सुविधा इतर ग्रामीण भागांतील आरोग्य केंद्रांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवासाठी धर्मप्रेमींचे काणकोण येथे स्वागत

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १७ :** फर्मागुडी फोंडा येथे सनातन संस्था आयोजित सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवासाठी कर्नाटक राज्यातून एकूण १४ बसेस मधून आलेल्या धर्मप्रेमींचे चार–रस्ता, काणकोण येथे काणकोण नगरपालिकेचे प्रभाग क्र.१ (नगर्से चे) नगरसेवक हेमंत नाईक गावकर व भाजपा महिला मोर्चाच्या दक्षिण गोवा जनरल सेक्रेटरी, मनुजा हेमंत नाईक गावकर, दक्षिण गोवा जिल्हा प्रमुख व बजरंग दलाचे श्री.गौरीश भैरेली, बजरंग दलाचे श्री. धनराज देसाई, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शिवराज देसाई, धर्मप्रेमी मल्लेश ना.गावकर, प्रताप पागी यांनी स्वागत केले.

यावेळी पुरोहित श्री. चैतन्य यांनी नारळ वाढवून व नगरसेवक हेमंत ना.गावकर आणि उपस्थित सर्व धर्मप्रेमींनी भगवे झेंडे दाखवून या सर्वांचे स्वागत केले. यावेळी नगरसेवक श्री.नाईक गावकर म्हणाले, भारत देश हिंदू राष्ट्रआहे, पंतप्रधान मा. मोदीजींचे स्वप्न साकार करणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच १७ मे ते १९ मे या दिवसात होणाऱ्या या सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात सहभागी होऊन धर्मप्रेम व राष्ट्रप्रेम जागृत करूया, असे त्यांनी आवाहन केले.

# भूमिका नर्सिंग कॉलेजमध्ये अग्निसुरक्षा जागरूकता कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १७ :** पर्ये सत्तरी येथील श्री भूमिका नर्सिंग कॉलेजमध्ये आपत्कालीन परिस्थितीत अग्निसुरक्षेच्या उपाययोजनांबद्दल मॉकड्रिलसह अग्निसुरक्षा जागरूकता कार्यक्रम संपन्न झाला.वाळपई येथील अग्निशमन केंद्राच्या पथकाने श्री भूमिका नर्सिंग कॉलेजच्या एएनएम, जीएनएम आणि बीएससी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना

कर्मचाऱ्यांना आग प्रतिबंधक आणि सुरक्षा उपायांबद्दल प्रशिक्षण दिले.

आगीपासून बचाव कसा करता येईल. सुरक्षा उपाय कोणते घेता येईल आणि आगीशी संबंधित घटनांदरम्यान आपत्कालीन माहिती देण्यात आली.

कॉलेजच्या एनएसएस उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.वाळपई येथील अग्निशमन केंद्राचे उपअधिकारी धनेश्वर



**साखळी : भूमिका नर्सिंग कॉलेजमध्ये यंत्रणेची माहिती देताना वाळपई येथील अग्निशमन दलाचे कर्मचारी.**

जी. गावकर,अग्निशमन दलाचे उपाध्यक्ष श्री. एन. कदम, अग्निशमन दलाचे अध्यक्ष प्रसाद सी. घाडी आणि ड्रायव्हर ऑपरेटर महादेव एस. गौडे यांचा समावेश होता.

कॉलेजच्या प्राचार्या प्रा. डॉ. एस. वसंतकुमारी यांनी सुरुवातीला स्वागत केले तसेच यावेळी त्यांनी विशेषतः आरोग्य सेवांमध्ये अग्निसुरक्षेचे महत्त्व यावर आपले विचार व्यक्त केले.धनेश्वर जी. गावकर यांनी 'आगी प्रतिबंधक' या विषयावर माहिती दिली. यात त्यांनी प्रमुख सुरक्षा उपाय,आणि आगीच्या धोक्यांची सामान्य कारणे या सारख्या विविध विषयांवर माहिती दिली.

त्यानंतर अग्निशमन विभागाच्या पथकाने अग्निशामक यंत्रांच्या वापरावर एक मॉक ड्रिल आयोजित केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखविली.तसेच त्यांनी यात विद्यार्थ्यांनाही समाविष्ट करून घेऊन त्यांच्याकडून प्रात्यक्षिके करून घेतली.या कार्यशाळेत १८ प्राध्यापक आणि २०० नर्सिंग विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कार्यक्रमाचा समारोप श्री भूमिका नर्सिंग कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी सुमेधा राणे यांनी अग्निशमन दलाच्या पथकाचे आभार मानले.



**व्हाळशी : विजय सरदेसाई यांच्याकडे पुस्तके सुपूर्त करताना अनंत जोशी. सोबत राजेश धोंड, डॉ. कौस्तुभ पाटणेकर व रणजीता कवठणकर.**

# वाचन संस्कृती जोपासणे काळाची गरज : अनंत जोशी

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १७ :** वाचाल तर वाचाल हे लक्ष्यात ठेऊन वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी कटिबध्द होण्याचे आवाहन अनंत गोपाळ जोशी यांनी केले. पुणे येथील एका नामांकित कंपनीत नोकरी करून निवृत्तीनंतर सद्या व्हाळशी डिचोली येथे स्थाईक झालेले अनंत जोशी यांनी आपल्याकडील बहुमोल ग्रंथसंपदा विद्यावर्धक मंडळ संचालीत नुतन वाचनालय डिचोली यांना भेट दिली आहे.

मंडळाचे अध्यक्ष विजय सरदेसाई, राजेश धोंड, डॉ. कौस्तुभ पाटणेकर, ग्रंथपाल रणजीता कवठणकर आदिंची या प्रसंगी उपस्थिती होती.

विजय सरदेसाई यांनी या वेळी नूतन ग्रंथालय विषयी सविस्तर माहिती दिली. या ग्रंथालयात नियमित येणाऱ्या वाचकांचा गौरव करण्यात येतो. तसेच विविध उपक्रम राबविले जातात असे श्री.सरदेसाई यांनी सांगितले व अनंत जोशी यांचे आभार मानले.

स्वागत व प्रास्ताविक रणजिता कवठणकर यांनी केले.

# बांदा येथे आज संभाजी भिडे यांचे व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. १७ :** हिंदुत्वचे धगधगते अग्निकुंड गुरुवर्य सांभाजीराव भिडे गुरुजी हे जाहीर व्याख्यानाच्या निमित्ताने रविवार दि. १८ रोजी बांदा शहरात येत आहेत. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान व हिंदू एकता मंच बांदा यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात सायंकाळी ५ वाजता येथील आनंदी मंगल कार्यालयात गुरुजींचे जाहीर व्याख्यान होणार आहे.

भिडे गुरुजी यांचा दौरा पुढीलप्रमाणे. रविवारी सायंकाळी ४ वाजता गवळीटेंब येथे गुरु कल्याणकर यांचे घरी चहापानाकरिता राखीव. तेथून निमजगा येथील जि.प. शाळा रस्ता मार्गे हिंदवी स्वराज्य ध्वजस्तंभाजवळ नमन व पूजन.

तेथून हॉस्पिटल कट्टा, जि.प. शाळा नंबर १ मार्गे बांदेश्वर मंदिर येथे दर्शन. तेथून जुन्या ग्रामपंचायत समोरून गांधीचौक मार्गे आनंदी मंगल कार्यालय, कट्टा कॉर्नर येथे सभेकरीता उपस्थिती. औक्षण व व्याख्यान. या कार्यक्रमात गुरुजींच्या हस्ते गोरक्षकांचा सन्मान करण्यात येणार आहे. नवीन उड्डाणपूलाखाली नामकरण करण्यात आलेल्या श्रीराम चौक फलकाचे अनावरण करण्यात येणार आहे. सभा संपल्यानंतर डोंगरआळी येथील निलेश सावंत यांच्या घरी जेवणाकरिता राखीव त्यानंतर सांगली येथे प्रस्थान करणार आहेत. गुरुजींच्या धगधगत्या, तेजस्वी, ओजस्वी वाणीतुन देव, देश, धर्म समजुन घेण्यासाठी सर्व हिंदू बांधवांनी आपले धर्म कर्तव्य समजुन मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन हिंदू एकता मंचकडून करण्यात आले आहे.

# अडवलपाल येथील ब्राह्मण देवस्थानच्या सुशोभीकरण कामासा प्रासभ

**CHANGE IN NAME**

I, **WAHIDA SHAIKH,** a resident of D-T-4, PEREIRA COMPLEX GOGOL MARGAO SALCETE SOUTH GOA 403601 would like to change my name from **WAHIDA HARUN MUZAVOR SHAIKH** to **WAHIDA SHAIKH**. Hereafter in all my dealings & documents, I will be known by my name **WAHIDA SHAIKH.**

**CHANGE IN NAME**

I am holder of Passport No: **E3107506** and expired on dated **04/09/2012,** r/o. H. No.408, Carriamoddi Cacora Curchorem South Goa. do hereby change my name from Sabina Mohammed Jafar Patel to SHABINA MOHAMMAD JAFFAR SHAIKH My Father Name is changed from Faqir Mohammed to FAKIR MOHAMAD; My Mother Name is changed from Zaibunnisa Faqir Mohammed to JAIBUNISSA FAKIR MOHAMAD; My Spouse Name is changed from Patel Mohammed Jafar Samsuddin to MOHAMMAD JAFFAR SHAIKH. I also undertake to carry out this name changes in all my documents of Myself, My Father, My Mother& Spouse Names & will be known as **SHABINA MOHAMMAD JAFFAR SHAIKH; FAKIR MOHAMAD; JAIBUNISSA FAKIR MOHAMAD & MOHAMMAD JAFFAR SHAIK respectively.**

VILLAGE PANCHAYAT USGAO - GANJEM PONDA – GOA
Ref. No. VPUG/ Auction/2025-26/ 471
Date: 17/05/2025

**NOTICE OF AUCTION**

Application form in the prescribed format is hereby invited from interested individual residing / agency or firm registered within the Jurisdiction of Village Panchayat Usgao Ganjem only for rent out of the Panchayat Gym in old Panchayat Building on ground floor on monthly rented basis by TENDER AUCTION in V.P. Office Usgao Ganjem, Usgao Ponda Goa as under:-.

| Sr. No | Shops |
|---|---|
| 1 | Panchayat Gym |

The application form with terms and conditions of the said auction will be available in the office of V.P Usgao Ganjem from **17/05/2024 to 28/05/2025 by 10.30 a.m** and interested individual / agency or firm will need to purchase the same by making an payment of (Rs.500/- only Non- refundable) in cash.

The last date for the submission of the forms along with the relevant documents in sealed envelope has been scheduled on **29/05/2025 by 10.30 a.m** and the same will be opened on same day at **11.30 a.m** in the office of the Village Panchayat, Usgao Ganjem, Usgao, Ponda-Goa.

The Panchayat has reserved the rights to reject or accept any or all the applications without assigning any reason thereof.

Sd/- ( Ramnath G. Dangi ) Seal
Sarpanch,
Village Panchayat Usgao-Ganjem

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १७ :** डिचोली मतदारसंघातील गावकरवाडा – अडवलपाल येथील ब्राह्मण देवस्थानच्या आत्मनिर्भर भारत स्वयंपूर्ण गोवा निधीतून सुशोभीकरण कामाचा प्रारंभ नुकताच डिचोली मतदारसंघाचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांच्या हस्ते करण्यात आला. गावच्या मंदिरामध्ये लोकांची भावना दडलेली असून त्यातच मंदिराचे सुशोभीकरण झाल्यास मंदिराला आणखी प्रसन्नता येत असते. गावागावांतील विकासासाठी सरकारचेही चांगले सहकार्य लाभत असून यापुढेही जनतेकडून आलेल्या विकासकामाला अशाचप्रकारे प्राधान्य देऊन आवश्यकतेनुसार विकास



**अडवलपाल : ब्राह्मण देवस्थानच्या सुशोभीकरण कामास प्रारंभ करताना सरपंच सुबत्ता सामंत. सोबत आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, उपसरपंच विनश्री गावकर, शेखर परवार, गजानन पालकर व इतर.**

साधला जाईल, असे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी सांगितले.

गावच्या विकासासाठी आमदार डॉ. शेट्ये सदैव सकारात्मक असून ब्राह्मण देवस्थानच्या सुशोभीकरण कामामुळे मंदिराकडील परिसर सुशोभीत होईल, असे सुबत्ता सामंत यांनी सांगितले. आमदारांचे आभार मानले. या प्रसंगी सरपंच सुबत्ता सामंत, उपसरपंच विनश्री गावकर, पंच गजानन पालकर, शेखर परवार तसेच गावचे ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते.

# महिलांनी स्वावलंबी व्हावे : देवेंद्र गावस

▸ **शांतादुर्गा सेल्फ हेल्प ग्रुपचा वार्षिक मोहोत्सव उत्साहात साजरा**

■ टीम दैनिक हेराल्ड

**केरी, दि. १७ :** महिलांनी दुसऱ्यांवर अवलंबून नं राहता स्वतः स्वावलंबी व्हावे आपवे लहान मोठे खर्च स्वतःच्या पैशाने पुरावावे, असे प्रतिपादन पत्रकार देवेंद्र गावस यांनी केले श्री शांतादुर्गा सेल्फ हेल्प ग्रुपच्या दहावा वार्षिक मोहोत्सवात ते पाहुणे म्हणून बोलत होते.

पुढे संबोधताना त्यांनी उपस्थित महिलांना वेगवेगळ्या उद्योग धंद्या बद्धल मार्गदर्शन केले.

श्री शांतादुर्गा सेल्फ हेल्प ग्रुपचा दहावा वार्षिक मोहोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

घोटेली क्र. २ केरी येथील श्री. शांतादुर्गा सेल्फ हेल्प ग्रुपला या वर्षी




दहा वर्षे पूर्ण झाल्यामुळे त्यांनी तो मोठ्या उत्साहात साजरा केला. या मोहोत्सवाला खास करून गोव स्टेट सहकारी बँकचे व्येवस्थापक शिवाजी गाड उपस्थित होते. तसेच पत्रकार देवेंद्र गावस, स्थानिक पंच राजेश गावस व व्हिवा दीपाली परीट उपस्थित होत्या

शिवाजी गाड यांनी सर्व उपस्थित संस्थेच्या पदाधिकार्यांना बँकेतील व्यवहार कसा करावा, सभासधाना पैसे देताना कुठली सावधगिरी बाळगावी याची माहिती दिली. तसेच दीपाली परीट हिने सेल्फ हेल्प ग्रुपला असलेल्या योजना पटवून दिल्या, व्येवाहर ज्ञानाबरोबर स्वावलंबी कशे बनावे याचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमाला सेल्प हेल्प ग्रुपची अध्यक्ष – प्राची शेटकर, सचिव – प्रणिता शेटकर, खजिनदार – द्रिशा केरकर व बाकी सभासद यांची उपस्थिती होती.

# पं. योगराज यांचे सतारवादक म्हणून लौकित प्राप्त

## पंडित तुळशीदास नावेलकर | पंडित योगराज नाईक स्मृती स्वरयोगी कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७ :** पंडित योगराज नाईक यांनी चिकाटीने साधना करून व उस्ताद शाहिद परवेझ यांचे शिष्यत्व पत्करून सतारवादक म्हणून लौकिक प्राप्त केला. गोव्यात सतारवादनाच्या पर्वाला खऱ्या अर्थाने त्यांनी सुरवात केली, असे गौरोद्‌गार ज्येष्ठ तबलावादक पंडित तुळशीदास नावेलकर यांनी येथे काढले. पंडित योगराज नाईक प्रतिष्ठानतर्फे कला संस्कृती संचालनालयाच्या सौजन्याने संस्कृती भवन मधील बहुद्देशीय सभागृहात बुधवारी आयोजित केलेल्या स्वरयोगी कार्यक्रमात पंडित नावेलकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सन्माननीय पाहुणे कला संस्कृती संचालनालयाचे संचालक सगुण वेळीप, प्रसिद्ध सतारवादक विनायक चित्तार, प्रतिष्ठानच्या उपाध्यक्ष प्रशांती तळपणकर, सचिव पूनम बुधाळकर व्यासपीठावर उपस्थित होत्या.



**पणजी : पंडित योगराज नाईक स्मृती स्वरयोगी कार्यक्रमात सर्वेश राणे याला शिष्यवृत्ती प्रदान करतांना पंडित तुळशीदास नावेलकर. सोबत प्रशांती तळपणकर, सगुण वेळीप, विनायक चित्तार व पूनम बुधाळकर**

संगीताची साधना करणाऱ्या आजच्या शिष्यात आवश्यक चिकाटी, मेहनत दिसत नाही. सतार. शिकण्याकडे गोव्यातील विद्यार्थ्यांचा. कल दिसत नाही, अशी खंत पंडित तुळशीदास नावेलकर यांनी यावेळी व्यक्त केली व कला संस्कृती खात्याच्या अंतर्गत शिकवणाऱ्या संगीत शिक्षकांचा त्यांचा विद्यार्थ्यांसमोर अधूनमधून कार्यक्रम घडवून आणावा, संगीत शिकवणारे शिक्षक कसे शिकवतात यावर निरीक्षण ठेवावे अशा सूचना केल्या. या सूचना आपण स्वीकारत असल्याचे सगुण वेळीप यांनी आपल्या भाषणात मान्य केले. ते म्हणाले, कुठलीही कला ही आतून यायला हवी. पालकांनी आपल्या मुलांना सतारवादनाची गोडी लावून शिकायला उद्युक्त करायला हवे. ज्येष्ठ कलाकारानी उदयोन्मुख कलाकारांना मार्गदर्शन केले तर योगराज प्रतिष्ठानचे उद्दिष्ट साध्य होईल.

साईश देशपांडे यांनी योगराज नाईक यांच्याविषयी व प्रतिष्ठानच्या उपक्रमाविषयी माहिती दिली. योगराज यांच्या पत्नी श्रीमती उषा यांनी कलाकारांचा सन्मान केला. दत्तप्रसाद जोग यांनी सूत्रसंचालन केले. बिंदिया वस्त यांनी नमस्ते गोमंत कलाभूमी प्रार्थना म्हटली. प्रशांती तळपणकर यांनी आभार मानले. या सोहळ्याला योगराज यांच्या मातोश्री श्रीमती श्यामलता बोरकर उपस्थित होत्या.

### शिष्यवृत्तीचा मानकरी सर्वेश राणे

**योगराज नाईक प्रतिष्ठानतर्फे सतारवादनासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीचा यंदाचा मानकरी सर्वेश राणे ठरला. त्याला हरिश शर्मा पुरस्कृत दहा हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. सर्वेश राणे याच्या सतारवादनाने स्वरयोगी कार्यक्रमाला प्रारंभ झाला. त्याला गोरख सावंत यांनी तबला साथ दिली.**

**विनायक चित्तार यांचे प्रभावी सतारवादन**

विनायक चित्तार यांच्या प्रभावी सतारवादनाने स्वरयोगी कार्यक्रमाची सांगता झाली. त्यांनी आलाप, जोड, झाला व गत या क्रमाने झिंजोटी राग वाजविला. मिंड, गमक, गायकी व तंत्र अंग याचा आविष्कार त्यात होता. त्यांना मयंक बेडेकर यांनी वादनाच्या अंगाने उत्कृष्ट तबला साथ देऊन रंगत आणली.

# आमोणा पंचायत क्षेत्रातील शेतातील गाळ काढण्यास प्रारंभ



**आमोणा : शेतातील गाळ काढण्याचा कामाचा प्रारंभ करताना सरपंच सागर फडते. सोबत पंच सदस्य ग्रामस्थ व वेदांता कंपनीचे अधिकारी.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १७ :** आमोणा पंचायत क्षेत्रातील शेतातील मातीचा भराव (गाळ) काढण्याच्या कामाचा सरपंच सागर फडते पंचायत मंडळ तसेच वेदांताचे अधीकारी यांच्या उपस्थितीत प्रारंभ करण्यात आला. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत व वेदांता कंपनीचे सरपंच सागर फडते यांनी आभार मानले. गावातील शेत जमीन पडीक न ठेवता शंभर टक्के लागवडी खाली आणण्याचा संकल्प केला. तसेच येथील मासेमारी करणाऱ्यांनाही याचा लाभ होणार आहे. अमोना गावात मत्यपालनसाठी पोषक वातावरण आहे. या ठिकाणी पाण्याच्या अनेक मानसी आहेत. त्याठिकाणी सफाई तसेच मातीचा भराव काढण्यात येणार आहे.

जमीन लागवडीखाली आणता यावी यासाठी विविध प्रयत्न असून पोषक वातावरण तयार करून सपूर्ण पडीक जमीन लागवडी खाली यावी हा हेतू असल्याचे यावेळी सरपंच सागर फडते यांनी सांगितले.